**दिनांक १९/०३/२०१९**

**प्रेस नोट दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**"खुन करुन पसार झालेला आरोपी पोलीसांच्या ताब्यात"**

जनता वसाहतमध्ये झालेल्या निलेश वाडकर खुन प्रकरणातील आरोपी दिपक शेंडी ऊर्फ दिपक दत्तात्रय खिरीड याला दत्तवाडी पोलीसांनी अटक केली आहे.

दि.१७/०३/२०१९ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेश्‌न तपास पथकातील पो. ना. ५६५१ घोटकुले यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दिपक दत्तात्रय खिरिड ऊर्फ दिप्या शेंडी हा गो-हे(बु.),ता.हवेली जि.पुणे येथे सावली हॉटेल येथे त्याचे घरच्यांना भेटायला येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने ती त्यांनी पोउनि.संकपाळ यांचे मार्फतीने देविदास घेवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,दत्तवाडी पोलीस स्टेशन यांना तात्काळ कळविली तेव्हा सदर बातमीची खात्री करुन ते पोउनि संकपाळ, पो.ना.५६५१ घोटकुले, पो.ना.६७४० यादव, पो.ना.४४९१ गाढवे, पो.शि. ७७९० सुर्वे, पो.शि.९१९१ क्षीरसागर यांच्यासह साध्या वेशात गो-हे,बु.ता.हवेली,जि.पुणे येथे सावली हॉटेलजवळ जावुन दोन टिम करुन सापळा लावुन थांबले असता काही वेळाने दिपक दत्तात्रय खिरिड ऊर्फ दिप्या शेंडी हा आपण कोणाला ओळखु येणार नाही अशा तऱ्हेने चेहरा झाकुन सावली हॉटेल येथे आल्याचे त्यांना दिसल्याने त्यांनी त्यास सापळा रचुन पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने हुलकावणी देवुन पळण्याचा प्रयत्न केला त्यास झडप घालुन पोलीस नाईक सुधीर घोटकुले यांनी पकडले व निलेश वाडकर खुनाच्या गुन्हयात अटक केले. त्याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती आर.आर.भळगट यांच्या न्यायालयात गुन्हयाचे तपासी अधिककारी देविदास घेवारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तवाडी पोलीस स्टेशन यांनी हजर केले असता दि.२२ मार्च २०१९ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर झाली आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.